


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९७ वा शनिवार दि २० सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# सरकारचा लाडक्या बहिणींना झटका, वय चोरणाऱ्या महिलांचा पत्ता कट, एकाच घरातील तीन लाभार्थींवर तर...






**वृत्तसंस्था/ लातूर**

एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोघींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळेल असे स्पष्ट असतानाही काही कुटुंबांतील तिघी चौघी जणींनी नोंदणी केल्याचं निदर्शनास आले आहे. याशिवाय २१ ते ६५ वर्ष वयोगटाची अट असताना काही महिलांनी वयोमर्यादा ओलांडली असल्याचे पडताळणीत आढळले. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील ४ हजार ८२७ लाडक्या बहिणींचा पत्ता कट झाला आहे. महिला व मुलींना स्वावलंबी आणि राज्य आत्मनिर्भर बनविण्यासाठी शासनाच्या वतीने गेल्या वर्षी जुलै महिन्यापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही योजना सुरू झाल्याने लाभाचे नियम, अटींकडे फारसे लक्ष केंद्रित करण्यात आले नव्हते. त्यामुळे योजनेचा लाभ मिळावा म्हणून काही महिलांनी कुटुंबांत चारचाकी असणे, संगांयो, इंगांयो, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ घेत असतानाही नोंदणी केल्याचे निदर्शनास आले. याशिवाय, काही कुटुंबांतील तीन-चार महिलांनी तर काहींनी वय बसत नसतानाही अर्ज केल्याचे उघडकीस आल्याने फेरपडताळणी करण्यात आली. योजनेच्या लाभासाठी जिल्ह्यात ५ लाख ९२ हजार २३१ महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २४ हजार ७७२ प्रस्ताव अपात्र ठरले. सध्या लातुर जिल्ह्यात ५ लाख ६७ हजार ४५९ लाभार्थी महिला आहेत. शासनाच्या निर्देशानुसार २१ पेक्षा कमी व ६५ पेक्षा जास्त वय असलेल्या संशयित लाभार्थींच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यात १६१६ महिला अपात्र ठरल्या आहेत.तसेच एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांनी लाभ घेतल्याच्या संशयावरून ५५ हजार ०९२ महिलांच्या कागदपत्रांची तपासणी झाली. त्यात ३ हजार २११ महिला अपात्र ठरल्या आहेत. किमान २१, तर कमाल वय ६५ वर्षे असणे बंधनकारक आहे, मात्र काहींनी १९, २० वय असतानाही लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ६५ वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या महिलांचाही लाभार्थी यादीत समावेश असल्याचे प्रत्यक्ष पडताळणीत आढळून आले आहे.

# आदिवासींच्या जमिनी आता भाडेतत्त्वावर देता येणार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा

**वृत्तसंस्था/ गडचिरोली**

आदिवासींच्या जमिनी थेट भाडेतत्त्वावर देण्यासाठी राज्य सरकारने तयारी सुरू केली आहे. यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येणार, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. महसूल विभागाच्या बैठकीच्या निमित्ताने शुक्रवारी बावनकुळे गडचिरोली जिल्हा दौऱ्यावर आले होते. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, आदिवासी भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी गैरआदिवासींना देण्याची कुठलीही तरतूद कायद्यात नव्हती. आता या जमिनी गैरआदिवासींना भाडेतत्त्वावर देता येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या समक्ष हा भाडेपट्टा भरावा लागणार आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीत असलेल्या गौण खनिजाची खासगी कंपन्यांना उत्खनन आणि विक्री करण्याची परवानगी देण्यात येणार आहे. करार झाल्यानंतर उत्खनन केलेल्या गौण खनिजाच्या तुलनेत प्रतिटन किंवा प्रतिब्रास हा मोबदला आदिवासी शेतकऱ्याला द्यावा लागेल, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली राष्ट्रवादी काँग्रेस (शप)चे नेते जयंत पाटील यांच्या वडिलांचा उल्लेख करून टीका करणे चुकीचे आहे. ही भाजपची संस्कृती नाही. राजकारणात विरोधकांवर टीका केली जाते. मात्र व्यक्तिगत भाष्य करताना काळजी घ्यायला हवी. भविष्यात अशी चूक होऊ नये म्हणून आमदार गोपीचंद पडळकर यांच्याशी बोलणार असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. नागपुरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिंतन शिबिराच्या निमित्ताने ङ्गताई-दादाफएकत्र येण्याच्या अनुषंगाने झळकलेले फलक या कार्यकर्त्यांच्या भावना आहेत. त्यातून राजकीय अर्थ काढू नये. उद्धव आणि राज ठाकरे यांनी कितीही प्रयत्न केले तरी गडचिरोलीपासून मुंबईपर्यंतच्या सर्व निवडणुका महायुतीच



जिंकणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राहुल गांधी यांना आणीबाणी मान्य आहे. देशात अराजकता निर्माण करणाऱ्यांना मदत करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आणीबाणीचे संस्कार असलेल्यांकडून फार काही अपेक्षा नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

# श्राद्धाने नव्हे, प्रेमाने आई-वडील जिवंत ठेवा!

## संपादकीय लेख

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आपण अनेक गोष्टींना प्राधान्य देतो. नोकरी, व्यवसाय, पैसा, समाजातलं स्थान, मित्रमंडळींचा सहवास. मात्र या सगळ्यांच्या मागे धावताना आपल्या आयुष्याचा मूळ आधार असणाऱ्या आई-वडिलांकडे आपण किती वेळ देतो, हे पाहणं गरजेचं आहे. या काळात आपण घरं मोठी बांधली, गाड्या विकत घेतल्या, परदेशात पोहोचलो; पण आई-वडिलांसाठी वेळ देणं मात्र दुर्मिळ झालं आहे. हेच आपल्या संस्कृतीचं सर्वात मोठं दुर्दैव आहे. बालपणी आपल्या छोट्याशा हसण्यासाठी, एका खेळण्याच्या हट्टासाठी आई-वडिलांनी दिवस-रात्र घालवले. स्वतःच्या स्वप्नांना विराम देऊन त्यांनी आपली स्वप्नं पूर्ण केली. थकलेले असतानाही आईनं आपल्या पोटाला चिमटा काढत आपल्याला पोटभर खाऊ घातलं, वडिलांनी घामाने न्हाऊनसाखून आपल्यासाठी पै-पै जमवली. आपल्या प्रत्येक गरजेवर स्वतःच्या सुखाचा त्याग केला. शिक्षण, संस्कार, स्वप्नं. हे सर्व काही आपल्या मुलांना मिळावं म्हणून त्यांनी आपलं तारुण्य खर्च केलं. पण आज त्यांचं वय वाढलं, पाय कमजोर झाले, डोळ्यांची दृष्टी मंदावली, तरीही त्यांची अपेक्षा मोठी नसते. त्यांना फक्त आपल्या मुलांचं दोन प्रेमळ शब्द, थोडा वेळ, आणि साधं पण आपुलकीनं वाढलेलं अन्न हवं असतं.

आज तेच आई-वडील वृद्ध झालेत. चालणं मंदावलं, डोळ्यांची दृष्टी कमी झाली, पण अपेक्षा वाढल्या नाहीत. त्यांना फक्त मुलांनी वेळ काढून बोलावं, सोबत जेवावं, एक प्रेमळ शब्द बोलावा, एवढंच पुरेसं असतं. मात्र वास्तव भीषण आहे. आपण अनेकदा पाहतो की आई-वडील वृद्धाश्रमात राहायला भाग पाडले जातात. बऱ्याच ठिकाणी आई-वडील दुर्लक्षित आहेत, काहींना वृद्धाश्रमात पाठवून दिलं जातं. पैशापाठी धावणाऱ्या पिढीला हे समजत नाही की, आई-वडिलांचा आशिर्वादच आपल्या आयुष्याचं खरं धन आहे. काही मुलं वारंवार ङ्कवेळ नाहीफ, ङ्ककामं खूप आहेतफ असं म्हणून त्यांना दूर ठेवतात. पण खरी गोष्ट अशी आहे की वेळ आपल्याकडे आहे, फक्त प्राधान्य बदललेलं आहे. आजची पिढी तंत्रज्ञानात, करिअरमध्ये, पैशाच्या मागे इतकी धावते आहे की ङ्कआशीर्वादफ या अमूल्य संपत्तीचं महत्व विसरली आहे. आई-वडिलांचा हात डोक्यावर असेपर्यंत आपण सुरक्षित आहोत. तो हात निघून गेला की, कोणतेही श्राद्ध आपल्याला ती उब परत देऊ शकत नाही.

आपल्या समाजात एक विचित्र विडंबन पाहायला मिळते. आई-वडील जिवंत असताना त्यांना चार गोड बोल बोलायला, त्यांच्या सोबत बसून दोन घास जेवायला, त्यांच्या औषधोपचारांसाठी पैसा खर्च करायला अनेकदा हात आखडता घेतो. पण ते या जगातून गेल्यावर मात्र मोठ्या थाटामाटात दहावे, तेरावे, श्राद्ध, पिंडदान यांसारखे विधी करतो. समाजाला दाखवण्यासाठी केलेले हे आडंबर खऱ्या अर्थाने ङ्कप्रेमाचा देखावाफ ठरतो. ज्या आईनं उपाशीपोटी राहून मुलांना खाऊ घातलं, ज्या वडिलांनी अंगावरच्या घामाच्या धारा गाळून मुलांचं भविष्य घडवलं, त्यांच्यासाठी एक ग्लास पाणी जिवंत असताना वेळेवर द्यायला जमलं नाही, तर मृत्यूनंतर पिंडदान करून त्याचा काय उपयोग? खरी सेवा ही जिवंतपणी केली जाते, मृत्यूनंतर केलेली सेवा केवळ औपचारिकता उरते.

आज समाजात हे प्रमाण वाढत चाललं आहे. वृद्ध आई-वडिलांना ङ्कओझंफ समजून त्यांना दुर्लक्षित केलं जातं. काहींना तर वृद्धाश्रमात ढकलून दिलं जातं. आणि नंतर त्यांच्या मृत्यूनंतर समाजात प्रतिष्ठा टिकवण्यासाठी धूमधडाक्यात श्राद्ध केले जातात. हा दांभिकपणा लपवून ठेवता येत नाही. श्राद्ध, तर्पण, दहावे-तेरावे या परंपरांचा हेतू वेगळा होता. मृत व्यक्तीच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहणं, कृतज्ञता व्यक्त करणं. पण आज ते स्पर्धा, प्रतिष्ठा आणि दिखाव्याचं साधन बनलं आहे. लोकांना समाजात आपलं ङ्कनावफ हवं असतं, पण आई-वडिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचं महत्व समजत नाही. आई-वडिलांच्या आठवणी, त्यांच्या आशीर्वादांची किंमत आपल्याला ते या जगातून गेल्यावरच प्रकर्षानं जाणवते. समाजाला यावेळी एक मोठा प्रश्न विचारावा लागतो, जिवंत असताना थोडं प्रेम, थोडा वेळ,



थोडं सांत्वन दिलं असतं, तर श्राद्धासाठी हजारो रुपयांचा खर्च करण्याची गरज पडली असती का?फ

म्हणूनच आजच्या समाजाला हे आवर्जून सांगावंसं वाटतं, ङ्कआई-वडील जीवंत असताना त्यांना चांगलं खाऊ घाला, वेळ द्या, प्रेम द्या, जपा, सेवा करा. मृत्यूनंतरच्या विधींना अर्थ नाही, खरी पूजा ही त्यांना हसतमुख ठेवण्यात आहे. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं समाधानाचं हास्यच तुमच्या आयुष्याचं खऱ्या अर्थानं यश आहे.फ त्यांच्या डोळ्यातील आनंदच तुमच्या आयुष्याचं खरं धन आहे. समाजाला यावेळी एक मोठा प्रश्न विचारावा लागतो, जिवंत असताना थोडं प्रेम, थोडा वेळ, थोडं सांत्वन दिलं असतं, तर श्राद्धासाठी हजारो रुपयांचा खर्च करण्याची गरज पडली असती का?फ श्राद्ध नव्हे, जिवंतपणीचं प्रेम हेच खऱ्या अर्थानं आई-वडिलांना अर्पण केलेलं आहे.






## आक्रोश मोर्चा ६ आक्टोबरला मूळ आदिवासी समाजाची आरक्षण बचावसाठी बैठक संपन्न.....

**जनसंचलन/ बुलडाणा**

महाराष्ट्रात मागिल अनेक वर्षापासून आदिवासी समाजामध्ये गैर आदिवासी समाजाचे आरक्षण मिळावं म्हणून आंदोलन, मोर्चे चालू आसून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करून आरक्षण देण्याची मागणी हैदराबाद गॅझेटनुसार केली आहे, त्याच अनुषंगाने हैदराबाद गॅजेटचा आधार घेऊन बंजारा व इतर समाजाने सुद्धा आदिवासी समाजात समाविष्ट करून आरक्षण देण्याची मागणी करण्यासाठी जोर धरला आहे दरम्यान या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील सकल आदिवासी समाजाची विश्राम भवन बुलढाणा येथे १७ सप्टेंबर रोजी बैठक संपन्न झाली, यावेळी मूळ आदिवासी समाजाचा आरक्षण बचाव आक्रोश मोर्चाचे आयोजन दिनांक ६ अक्टोबर २५ रोजी सर्वनुमते ठरले आहे, यावेळी एक तिर एक कमान सर्व आदिवासी एक



समानचा नारा देत ६ ऑक्टोबर रोजी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर सकाळी ११:३० वाजता एकलव्य महाराज चौक गांधी भवन जवळ या ठिकाणावरून आयोजन करण्याचे ठरले आहे करण्यात चे ठरले आहे. त्याचं बरोबर १२५०० अतिरिक्त झालेल्या ठिकाणी आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांची नोकर भरती करावी यासह अनेक मागण्यासाठी करण्यात मोर्चा काढण्याचे ठरले आहे.यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील सकल आदिवासी समाजाचे सामाजिक कारकर्ते विविध आदिवासी संघटनेचे पदअधिकारी तसेच आजी माजी जि. प. प.स. सदस्य या बैठकीस मोठ्या संख्येने हजर होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदेंच्या शिवसेनेने पुण्यात कंबर कसली, महापालिकेआधी मोठा गेम, महायुतीतीलच इच्छुक आमनेसामने...



**पुणे** : आगामी महापालिका निवडणुकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे शहरात जोरदार कंबर कसली आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू आहे. महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या वाढत चालली आहे. भाजपमध्ये इच्छुकांची संख्या सर्वाधिक असताना, सलग आठ वर्षे भाजपमध्ये काम केलेले नितीन पायगुडे यांनी आता शिंदे गटात प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे, मनसे आणि शिवसेना ठाकरे गट युतीबाबत चर्चा सुरू असतानाच, मनसेचे आक्रमक कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र ढगे पाटील यांनी मनसेला जय महाराष्ट्र करत शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यांचा प्रवेश मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झाला. त्यामुळे आगामी काळात शिंदे गटाची महापालिकेत स्वबळावर लढण्याची तयारी असल्याचे चित्र दिसत आहे. मनसेत विद्यार्थी संघटनांतर्गत काम करताना रणजित ढगे पाटील आक्रमक कार्यकर्ता म्हणून ओळखले जात होते. २०१६ मध्ये चांदणी चौक टोलनाका फोडल्याप्रकरणी त्यांना जेलही झाली होती. त्यापूर्वी, २०१४ मध्ये राष्ट्रवादीच्या एका नेत्याने राज ठाकरे यांच्या गाडीवर दगडफेक केली होती. त्याच्या विरोधात पुण्यातील हिराबाग येथील राष्ट्रवादीचे कार्यालय फोडण्यात आले होते. आक्रमक भूमिकेबरोबरच त्यांनी सामाजिक कामही केले. मात्र, आगामी महापालिका निवडणुकीचा विचार करून त्यांनी शिंदे गटाचा झेंडा हातात घेतला आहे.रणजित ढगे पाटील हे प्रभाग क्र. २५ मधून इच्छुक असून, या प्रभागात पूर्वी चार नगरसेवक भाजपचे होते. हेमंत रासने आमदार झाले, तर माजी आमदार मुक्ता टिळक यांचे निधन झाले आहे. या प्रभागात रणजित ढगे पाटील यांना संधी मिळते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. नितीन पायगुडे यांनी गेली आठ वर्षे भाजपासाठी विविध पातळीवर काम केले आहे. सोशल मीडिया सेल, आर्थिक स्रोत, आंदोलनांची आखणी, इव्हेंट मॅनेजमेंट अशी अनेक कामे त्यांनी हाताळली आहेत. ते प्रभाग क्र. ३७ मधून इच्छुक असून, तिथे गेल्या काही वर्षांपासून सातत्याने काम करत आहेत. त्यामुळेच त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पुणे शहरातील एकही जागा शिंदे गटाला मिळाली नव्हती. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. परंतु या वेळी शिंदे गट जय्यत तयारी करत असल्याचे दिसत आहे. मात्र या तयारीचा आगामी निवडणुकीत नेमका किती परिणाम होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# गाडीचा पाठलाग करत धडक दिली, भरपाईची मागणी करत गाडीत कोंबलं;

## रत्नागिरीमध्ये प्रसिद्ध ज्वेलर्सच्या मालकाला लुटलं



**रत्नागिरी** : रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील देवरुख येथील केतकर ज्वेलर्सचे मालक धनंजय गोपाळ केतकर (वय ६३) यांच्यावर बुधवारी रात्री १०.०० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास प्राणघातक हल्ला झाला. साखरपा देवरुख मार्गावरील वांझोळेपासून एक किलोमीटर अंतरावर काही अज्ञातांनी त्यांचं अपहरण करून त्यांना लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय केतकर हे रात्री साखरपा येथून घरगुती कार्यक्रम आटपून देवरुख येथे जात असताना वांझोळे येथून एक किलोमीटर अंतरावर अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गाडीचा पाठलाग केला. पाठलाग करताना गाडीला गाडी घासल्यामुळे वाटेतच गाडीची नुकसान भरपाई ते मागू लागले. याच गडबडीत केतकर हे गाडीतून उतरताच त्यांच्या अंगावर बुरखा टाकून त्यांना जबरदस्तीनं हल्लेखोरांनी आपल्या गाडीत कोंबलं. त्यानंतर वाटूळजवळ आणलं आणि मोठ्या रकमेची मागणी केली. त्यांच्याजवळील सुमारे १५ लाखांचे दागिने आणि २० हजारांची रोख रक्कम काढून घेतली आणि केतकर यांना चेहऱ्याला व अन्य ठिकाणी मारहाण करून सोडून दिलं.या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह तपासाची चक्रे फिरवण्यात आली. जिल्हा पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांनी या प्रकारची गंभीर दखल घेतली आहे.

याप्रकरणी अज्ञात दरोडेखोर यांच्या विरोधात संहिता २०२३चे कलम गुन्हा ३११, ३०९ (४), ३१० (१), १४० (२), १२७(२), ११५(२), ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा पोलिसांकडून युद्धपातळीवर तपास सुरू आहे. दरम्यान, घटनास्थळी अपर जिल्हा पोलिस अधीक्षक बाबुराव महामुनी यांनी भेट दिली आणि केतकर यांच्याकडून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. यावेळी या व्यापाऱ्याने आपल्याला तब्बल १० जणांनी घेरल्याची धक्कादायक माहिती दिली.

# पाकिस्तानच्या टार्गेटवर आता सूर्या, भारताच्या मॅचपूर्वी वाद पेटवणार, काय आहे प्रकरण जाणून घ्या...



पाकिस्तान काही शांत बसायचे नाव घेत नाही. आता भारताच्या सामन्यापूर्वी त्यांनी अजून एक नवा वाद पेटवण्याचे ठरवले आहे. यापूर्वी त्यांनी सामनाधिकारी अँटी पायक्रॉफ्ट यांच्या निलंबनाची मागणी केली होती. आता पाकिस्तान भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवला टार्गेट करणार असल्याचे समोर आले आहे. भारताच्या सामन्यापूर्वी पाकिस्तान नेमकं काय करणार आहे, हे आता समोर आले आहे. पाकिस्तानने आशिया कप स्पर्धेवरील बहिष्काराचा निर्णय मागे घेण्याची घोषणा यूएईविरुद्धच्या सामन्यापूर्वी केली होती. त्या वेळी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेस पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्यासह पाकचे माजी कर्णधार रमीझा राजा; तसेच माजी अध्यक्ष नजम सेठी उपस्थित होते. त्यातही राजा यांनी भारतीयांना जास्त लक्ष्य केले. राजा यांनी सूर्यकुमारला लक्ष्य करण्याचा विषय चर्चेला नसतानाही निर्माण केला. ङ्गप्रत्येकाच्या भावना लक्षात घेऊनच आम्ही भूमिका घेतली होती. मात्र, त्याचा क्रिकेटवर परिणाम होणार नाही ही काळजी घेतली. मात्र, त्यांनी हा प्रश्न पुढे नेला. तुमच्या ज्या काही भावना असतील त्या मैदानावर दाखवा. आपला संघ क्रिकेटमध्ये किती चांगला आहे, हे मैदानावर दाखवण्याची सूचना आम्ही आमच्या खेळाडूंना केली आहे. आमचा आक्षेप सामन्यानंतर जी काही शेरेबाजी झाली त्यासही आहे,फ असे रमीझ राजा यांनी सांगितले. त्यामुळे पाक आता हा मुद्दा ताणून धरणार असल्याची चर्चा आहे.हस्तांदोलन नाकारल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाची कोंडी करण्यात अपयश आल्यानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आता कर्णधार सूर्यकुमार यादवच्या प्रतिक्रियेबद्दल तक्रार करण्याचे ठरवले आहे. ङ्गपहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांसह आम्ही आहोत,फ अशी प्रतिक्रिया सूर्यकुमारने पाकविरुद्ध मिळवलेल्या विजयानंतर व्यक्त केली होती. याबद्दल पाक बोर्ड आता आयसीसीकडे तक्रार करून नवा वाद करण्याची चिन्हे आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ऐन दिवाळीत महाराष्ट्रातील गाव आणि शहरांचा पुन्हा संपर्क तुटण्याची भीती, एसटी कर्मचाऱ्यांचा मोठा इशारा...



**मुंबई :** ग्रामीण महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेची चिंता वाढवणारी बातमी समोर येत आहे. कारण एसटी कर्मचारी ऐन दिवाळीत पुन्हा एकदा आंदोलनाचं हत्यार उपसण्याच्या तयारीत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांनी याआधीदेखील ऐन दिवाळीत जवळपास महिनाभर आंदोलन केलं होतं. त्यांच्या संपामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा तालुका आणि जिल्ह्यांशी थेट संपर्क तुटला होता. आजही बहुसंख्य ठिकाणी एसटी ही वाहतुकीचं प्रमुख स्त्रोत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचा आजही प्रवासाचं महत्त्वाचं साधन हे एसटी बस आहे. तीन वर्षांपूर्वी जेव्हा एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता तेव्हा अनेक गाव-खेड्यांमधील नागरीक हवालदिल झाली होती. जिल्ह्यातून गावाला जाणं खूप खर्चिक झालं होतं. कारण खासगी वाहनांकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकारले जात होते. एसटी कर्मचाऱ्यांनी तीन वर्षांपूर्वी ऐन दिवाळीत संप पुकारल्यामुळे सर्वसामान्य जनतेला प्रचंड मनस्तापाला सामोरं जावं लागलं होतं. आता जर पुन्हा एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला तर त्याचा मोठा फटका ग्रामीण महाराष्ट्राला बसण्याची शक्यता आहे. तसेच शहरातून दिवाळीसाठी गावाकडे जाणाऱ्या नागरिकांनादेखील होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सरकारला एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत गांभीर्याने लक्ष देणं गरजेचं असणार आहे.ऐन दिवाळीच्या मुहुर्तावर एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या संघटनेने केला आहे. सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेकडून आत्मक्लेश आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईतील मध्यवर्ती कार्यालयात हे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्या शासनाकडे केल्या आहेत. पण शासनाकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वातील सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर ऐन दिवाळी आंदोलन होऊ शकतं. एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन करु नये यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काय निर्णय घेतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# आधी हिंदू धर्म आणि ब्राह्मणांवर टीका, आता...

## काँग्रेसचा नितेश राणेंवर निशाणा...



**सोलापूर :** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काल जत तालुक्यात भाषण करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या वडिलांवर टीका केली. काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी यांनी गोपीचंद पडळकर आणि नितेश राणेंवर सडकून टीका केली आहे. ङ्कङ्कनितेश राणे काँग्रेसमध्ये असताना त्यांनी हिंदू धर्मावर आणि ब्राम्हण धर्मावर टीका करत होते. भाजप पक्षात गेल्यापासून त्यांनी एका विशिष्ट समाजाला टार्गेट करण्याचा ठेका उचलला आहे. नितेश राणे पक्ष बदलले की धर्म बदलतातङ्कङ्क, अशी टीका काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी यांनी केली आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी जत तालुक्यात भाषण करताना आमदार जयंत पाटील यांच्यावर टीका केली. जयंत पाटील यांचे वडील राजाराम पाटील यांच्यासह जयंत पाटील यांच्या आईवरही टीका केली आहे. यावरुन काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी यांनी थेट भाजप पक्षावर टीका केली आहे. त्यांनी दिवंगत भाजपचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे आणि दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या स्नेहसंबंधाचं उदाहरण दिलं. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक होते, पण त्यांनी कधी कमरेखालची भाषा वापरली नाही, असं काकासाहेब कुलकर्णी म्हणाले. आम्ही जी भाजपा पाहिली ती अटल बिहारी वाजपेयी यांची, गोपीनाथ मुंडे यांची, सुषमा स्वराज यांची होती. पण आज भाजपातील काही वाचाळवीर हे महाराष्ट्राच्या राजकारणाचं स्वरूपच बदलवून टाकत आहेत. प्रश्न असा आहे की, जेव्हा आपण तरुणाईला राजकारणात येण्याचं आवाहन करतो, तेव्हा अशा भाषणांचा स्तर बघून तरुण काय शिकणार? हा महाराष्ट्र आहे की बिहार? असा प्रश्न प्रत्येकाला पडला आहेङ्कङ्क, अशी भूमिका काकासाहेब कुलकर्णी यांनी मांडली. दरम्यान, आता काँग्रेसच्या या टीकेवर नितेश राणे यांच्याकडून काय प्रतिक्रिया देण्यात येते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# कोल्हापुरात म्हशीने जन्माला घातलं दोन तोंडी रेडकू



**कोल्हापूर :** कधी कधी काही अशा घटना घडत असतात की, निसर्गाचा चमत्कारच म्हणूनच त्याकडे पाहावे लागते. कोणत्याही जीवाचा जन्म ही एक अलौकिक गोष्ट असते. मात्र कधी कधी जन्मावेळीच काही प्राण्यांमध्ये अजब वैशिष्ट्य पाहायला मिळत असते. अशीच एक अचंबित करणारी घटना कोल्हापुरात घडली आहे. कोल्हापुरातल्या एका शेतकऱ्याच्या म्हशीने दुतोंडी रेडकाला जन्म दिल्यामुळे सोशल मीडियावर या घटनेची जोरदार चर्चा सुरु झाली आहे.खरंतर कोल्हापूर जिल्ह्यातील घडलेल्या या असामान्य घटनेने सर्वांनाच चकित केले आहे. कोल्हापूरच्या बानगे गावातील रहिवासी सुरेश यशवंत सुतार यांच्या म्हशीने चक्क दोन तोंड असलेल्या एका रेडकाला मंगळवारी जन्म दिला. जन्मावेळी हे रेडकू सुरुवातीला इतर सामान्यच वाटत होते. मात्र म्हशीने जन्म दिल्यानंतर रेडकाला दोन डोके असलेलं पाहून सुतार कुटुंबीयांसह उपस्थित त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला होता. चार पायांसह जन्माला आलेल्या या रेडक्याचे शरीर एकच आहे, परंतु डोके आणि तोंड दोन आहेत. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर परिसरातून लोक या अजब अशा रेडक्याला पाहण्यासाठी गर्दी करु लागले. सोशल मीडियावर या रेडक्याच्या जन्मानंतरचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये रेडकाची दुहेरी डोकी स्पष्टपणे दिसत आहेत, ज्यामुळे त्याचे स्वरूप अधिकच आश्चर्यकारक वाटते.पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची घटना दुर्मिळ असते आणि ती जनुकीय दोषामुळे घडू शकते. गर्भाशयात असताना असामान्य पेशी विभाजनामुळे असे दोष निर्माण होण्याची शक्यता असते. यामुळे रेडकास सामान्य आयुष्य जगणे कठीण होऊ शकते. परंतु जन्मानंतर हे वैशिष्ट्यपूर्ण रेडकू जिवंत होते. मात्र जन्मल्यानंतर ४ तासानंतर त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान या घटनेने संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात आणि सोशल मीडियावरही चर्चांना उधाण आले आहे. अनेकजण याला निसर्गाचा चमत्कार मानत आहेत, तर काहीजण यामागील वैज्ञानिक कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. बानगे येथे सुरेश यशवंत सुतार यांच्या घरी सध्या या घटनेबाबत माहिती घेण्यासाठी नागरिकांची वर्दळ वाढली आहे.

# भारताच्या पदरी निराशा; पदकाचं स्वप्न भंगल;
# नीरज चोप्रा आणि सचिन यादवला अपयश

**टोकियो:** २०२५ च्या जागतिक अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेचा अंतिम सामना आज, १८ सप्टेंबर रोजी पार पडला. गतविजेता नीरज चोप्रा आणि पाकिस्तानचा अर्शद नदीम यांच्यावर लक्ष होते परंतु यावेळी दोघांनाही सुवर्णपदक जिंकता आले नाही. भारताचा सचिन यादवने निश्चितच प्रभावित केले, त्याने ऑलिंपिक पदक विजेते नीरज चोप्रा आणि अर्शद नदीम या दोघांनाही मागे टाकले.भारतीय भालाफेकपटू सचिन यादवचा पहिला फेक ८६.२७ मीटर होता. त्याचा दुसरा फेक फाऊल झाला आणि त्यानंतर त्याचा तिसरा फेक आला. त्यानंतर त्याने चौथ्या फेकमध्ये ८५.७१ मीटर






फेकले. त्याच्या पाचव्या प्रयत्नात त्याने ८४.९० मीटर फेकले. त्याच्या सहाव्या प्रयत्नात त्याने ८०.९५ मीटर फेकले. तो पदक जिंकण्यात अयशस्वी झाला. तो चौथ्या स्थानावर राहिला.भारताचा नीरज चोप्रा कदाचित ही स्पर्धा जिंकला नसेल, परंतु त्याने अर्शदला मागे टाकले. चोप्रा त्याच्या लयीत नसल्याचे दिसून आले. त्याची सर्वोत्तम कामगिरी ८४.०३ मीटर होती. नीरज चोप्राचा तिसरा आणि पाचवा थ्रो फाऊल होता. त्याने त्याचा दुसरा थ्रो ८४.०३ मीटरने फेकला, तर नीरज चोप्राचा पहिला थ्रो ८३.५ मीटरने फेकला. त्याच्या चौथ्या प्रयत्नात नीरजने ८२.८६ मीटर फेकला. नीरज चोप्रा टॉप ८ च्या पुढे जाऊ शकला नाही.पाकिस्तानच्या अर्शद नदीमने संपूर्ण स्पर्धेत चार थ्रो केले, ज्यामध्ये त्याची सर्वोत्तम कामगिरी ८२.७५ मीटर होती. अर्शदने तिसऱ्या थ्रोमध्ये हे साध्य केले. त्याचा दुसरा आणि चौथा थ्रो फाऊल होता. अर्शद नदीम फक्त टॉप १० मध्ये पोहोचला. त्यानंतर, तो टॉप ८ मध्ये स्थान मिळवू शकला नाही. ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा नेहमीच भारताचा झेंडा जगभर उंचावतो. यावेळी भारताचा स्टार अ‍ॅथलीट नीरज चोप्रा जागतिक अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पहिल्याच फेऱ्यात ८४.८५ मीटर अंतरापर्यंत भालाफेक करुन पात्र ठरला आहे. काल या चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्रता फेरी होती आणि भारताच्या नीरज चोप्राने त्याच्या पहिल्याच प्रयत्नात अंतिम फेरीत स्थान मिळवले. जपानची राजधानी टोकियो येथे जागतिक अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, गट ब मध्ये, अर्शद नदीमला फायनलसाठी संघर्ष करावा लागला. त्याचे पहिले दोन थ्रो निराशाजनक होते पण नंतर शेवटच्या थ्रोमध्ये जोरदार पुनरागमन केले आणि ८५.२८ मीटरच्या शानदार थ्रोसह त्याने फायनलमध्ये आपले स्थान निर्माण केले.

## सई ताम्हणकरने सांगितली भोपळ्याची सर्वात सोपी रेसिपी, मिरची मसाला काहीच नको

बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री सई ताम्हणकर केवळ तिच्या दमदार अभिनयासाठीच नाही, तर तिच्या साध्या आणि हेल्दी लाइफस्टाइलसाठीही ओळखली जाते. अलीकडेच तिने एक खास रेसिपी चाहत्यांसोबत शेअर केली असून ती खूप चर्चेत आली आहे. सईला आवडणारी ही भाजी म्हणजे भोपळ्याची भाजी. पण ही भाजी बनवताना ती अजिबात मसाले वापरत नाही. फक्त तूप आणि मीठ या दोन गोष्टींच्या सहाय्याने ती ही भाजी तयार करते. सईनुसार, भोपळ्याची नैसर्गिक गोडसर चव अशी साधी रेसिपी बनवल्यावरच खरी खुलून येते. यामुळे भोपळ्यातील पोषणमूल्ये टिकून राहतात आणि भाजीही झटपट तयार होते

**साहित्य:** भोपळा किलो (साल काढून चौकोनी तुकडे) तूप २ टेबलस्पून मीठ चवीनुसार

**कृती :** भोपळ्याचे तुकडे स्वच्छ धुवून घ्या. एका कढईत तूप गरम करून त्यात भोपळा घाला. झाकण ठेवून मंद आचेवर शिजवा. मध्ये एक-दोनदा ढवळा. भोपळा मऊ झाला की





चवीनुसार मीठ घाला. गॅस बंद करून भाजी गरमागरम सर्व्ह करा.

**भोपळ्याचे पोषणमूल्य**

भोपळा हा आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त समजला जातो. त्यामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन , फायबर, पोटॅशियम आणि अँटी-ऑक्सिडंट्स असतात. हे घटक शरीराला ऊर्जा देतात, पचनक्रिया सुधारतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

**भोपळ्याचे काही आरोग्यदायी फायदे**

वजन कमी करण्यास मदत, डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त, हृदयविकाराचा धोका कमी करतो पचनक्रिया सुधारतो, त्वचेचा ग्लो नैसर्गिकरीत्या वाढवतो

**मसाले न वापरता चवदार का लागते?**

भोपळ्याची गोडसर चव नैसर्गिक असते. मसाले घातल्यास तो स्वाद झाकला जातो. पण फक्त तुपात परतून शिजवल्यास भोपळ्याचा मूळ स्वाद खुलतो. त्यामुळे ही भाजी साधी असूनही चवदार लागते.

**झटपट आणि हेल्दी पर्याय**

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत कमी वेळात हेल्दी जेवण बनवणे अवघड जाते. अशावेळी ही भाजी आदर्श पर्याय ठरते. पोळी, भाकरी किंवा साध्या भाताबरोबर ही भाजी अप्रतिम लागते.सई ताम्हणकरने शेअर केलेली भोपळ्याची ही साधी रेसिपी केवळ स्वादिष्ट नाही तर पौष्टिकही आहे. मसाले न वापरता, फक्त तूप आणि मीठात बनवलेली ही भाजी प्रत्येकाने नक्की करून पाहावी. साधेपणातली हीच खरी चव आहे, हे या रेसिपीमधून लक्षात येते.

## आई-वडील विभक्त, चारही बहिणींना नातेवाईकांकडे सांभाळायला दिलं; नराधाम दाम्पत्याकडून संतापजनक कृत्य

**अहिल्यानगर (राहुरी) :** राहुरी पोलिसांनी ऑपरेशन मुस्कान अंतर्गत मोठी कारवाई करत चार अल्पवयीन मुलींना लैंगिक अत्याचाराच्या नरकयातनेतून मुक्त केलं आहे. मागील तीन-चार वर्षांपासून दवणगाव (ता. राहुरी) येथील बजरंग कारभारी साळुंखे (वय ३९) आणि त्याची पत्नी शितल बजरंग साळुंखे (वय ४०) या दाम्पत्यानं या मुलींवर अमानुष अत्याचार केल्याचं उघडकीस आलं आहे. अहिल्यानगर येथील स्नेहालय संस्थेच्या स्वयंसेवक पूजा दहातोंडे यांनी दिलेल्या माहितीनंतर १७ सप्टेंबर रोजी रात्री राहुरी पोलिसांनी ही कारवाई केली. पीडित मुलींचे आई-वडील विभक्त झाल्यानं त्या मुलींना दूरच्या नातेवाईकांकडे सांभाळासाठी देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यांचा गैरफायदा घेत लैंगिक शोषण सुरू असल्याचं तपासात उघड झालं. पीडित मुलींमधील एक सज्ञान झाल्यानंतर तिने ही बाब स्नेहालयाला सांगितली. त्यानंतर पोलिसांना तात्काळ माहिती देताच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने धाड टाकली. रात्री साडेबारा वाजता सर्व चार मुलींना वाचवण्यात आलं. मुलींचं समुपदेशन करून त्यांना स्नेहालय संस्थेत दाखल करण्यात आलं आहे. आरोपी दाम्पत्याविरोधात भादंवि कलम ३७६, ३७६(२) आणि पोस्को कलम ४, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राजू जाधव व पोलिस कॉन्स्टेबल गणेश लिपणे करत आहेत. दरम्यान, ऑपरेशन मुस्कानअंतर्गत गेल्या वर्षभरात एकूण ८६ अपहरण व लैंगिक अत्याचारग्रस्त मुला/मुलींची सुटका करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलींचे आई-वडील हे एकमेकांपासून वेगळे झाले होते. यामुळे या चारही मुली निराधार झाल्या होत्या. यामुळे या मुलींचा सांभाळ त्यांचे दूरचे नातेवाईक करत होते, अशी माहिती समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सांभाळ करणाऱ्यानेच त्या चारही मुलींवर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणी आता राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीसह त्याच्या पत्नीलाही अटक केली आहे. या प्रकरणात आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चित्रपटात ललितची होणारी पत्नी आहे तरी कोण? पहिल्याच सिनेमात तिने वेधलं लक्ष

**मुंबई:** आरपार सिनेमाची सध्या चांगलीच चर्चा सुरू आहे. या सिनेमात ललित प्रभाकर आणि ऋता दुर्गुळे यांच्या भूमिका आहेत. सोबतच अनेक कलाकारांनी त्यांच्या अभिनयानं लक्ष वेधून घेतलं आहे. मराठी सिनेविश्वात असे अनेक नवोदित कलाकार आहेत जे त्यांच्या अभिनयातून रसिक प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतात. बरेचदा या कलाकारांची पहिलीच एंट्री अनेकांना भावते. आणि आजही ही आपली मराठी इंडस्ट्री अनेक नव्या चेहऱ्यांना मोठं होण्याची संधी देते.अशातच आता एका मराठमोळ्या नवोदित चेहऱ्याच्या एंट्रीवर अनेकांच्या नजरा खिळल्या आहेत. ही अभिनेत्री म्हणजे जान्हवी सावंत . सध्या चर्चेत असलेल्या आरपार या चित्रपटातून जान्हवीने सिनेविश्वात पदार्पण केलं आहे. आरपार चित्रपटात ऋता-ललितसह चित्रपटातील इतरही कलाकारांनीही त्यांच्या अभिनयाने चित्रपटाची उंची वाढविली. दरम्यान, चित्रपटात झळकलेल्या नव्या चेहऱ्याने साऱ्यांचं लक्ष वेधलं. ही नवी अभिनेत्री नक्की कोण?, असा प्रश्नही साऱ्यांना पडला. तर अभिनेत्री जान्हवी सावंत हिनं आरपार सिनेमातून सिनेविश्वात एंट्री केली. जान्हवीची सिनेविश्वातील एंट्री प्रेक्षकांना भावली.अभिनेत्री जान्हवी सावंत हा प्रवास आता जान्हवीनं आरपार या सिनेमातून सुरु केला आहे. या चित्रपटात तिनं ललितची होणारी पत्नी ही भूमिका साकारली, मात्र ही भूमिका चित्रपटात ट्विस्ट येताच दूर गेली.

तिची भूमिका, तिचा अभिनय, तिचे व्यक्तिसौंदर्य सारे काही प्रेक्षकांना भावले आणि आरपारमुळं जान्हवीला विशेष प्रेम मिळत आहे. नवोदित अभिनेत्री म्हणून जान्हवीचा प्रवास आता खऱ्या अर्थाने सुरु झाला आहे.एकूणच या प्रवासाबाबत जान्हवी म्हणाली, ङ्कआरपारमुळे मला सिनेइंडस्ट्रीत येण्याची संधी



मिळाली याबाबत मी साऱ्यांची ऋणी आहे. हा माझा पहिलाच चित्रपट आहे. आणि पहिल्यांदाच अभिनय करताना खूप चांगल्या सहकलाकारांबरोबर स्क्रीन शेअर करायला मिळाली हे माझं भाग्यच म्हणायला हवं. आरपार चित्रपटाने मला खऱ्या अर्थाने सिनेविश्वातील मार्ग मोकळे करुन दिले आहेत. आता आणखी बऱ्याच प्रोजेक्टवर काम करायचं आहे आणि मी उत्सुक आहे.

# अनुषासोबत रिलेशनशिपच्या चर्चा, भूषण प्रधानची दुसऱ्याच अभिनेत्रीसोबत रोमँटिक पोस्ट; चर्चेला उधाण

**मुंबई -** भूषण प्रधान हा मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेता असून त्याचा मोठा चाहतावर्गसुद्धा आहे. भूषणने अनेक गाजलेल्या मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलंय. भूषणला मराठीतील हँडसम चॉकलेट बॉय म्हणतात. भूषण सोशल मीडियावर कायम सक्रीय असतो आणि त्याच्या विषयीचे अपडेट्स चाहत्यांसोबत शेअर करतो. अशातच आता भूषणने सोशल मीडियावर केलेली पोस्ट चर्चेचा विषय बनली आहे. त्यामुळे त्याचे चाहतेसुद्धा बुचकळ्यात पडले आहेत.भूषण प्रधानने त्याच्या इन्स्टाग्रामवर अभिनेत्री केतकी नारायणसोबत काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये केतकीने साडी परिधान केली असून भूषणने कुर्ता परिधान केलाय. मात्र, या फोटोंमधील पहिल्याच फोटोनं चाहत्यांना बुचकळ्यात पाडलंय. केतकीच्या पोटावर हात ठेऊन भूषणने मॅटर्निटी फोटोशूट करतात तशी पोज दिली आहे. त्याचबरोबर हे फोटो शेअर करत, आमच्याकडे एक गोड सरप्राईज आहे असं कॅप्शन लिहिलं आहे. त्यामुळे आता



भूषण लग्न न करताच बाबा होणार का? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे.भूषण प्रधानच्या या फोटोंवर चाहत्यांनी, एक मिनिट तुझं लग्न कधी झालं???, फोटो बघून नक्की काय ठरवायचं लग्न झालं आहे की बाळ होणार आहे, हे कधी झालं गेल्या दिवाळीत तो म्हणाला होता की लग्नाचं प्लॅनिंग करतोय... अशा कमेंट्स केल्या आहेत. त्याचबरोबर काहींनी अभिनेत्याचं अभिनंदनसुद्धा केलंय. त्यामुळे आता भूषण आणि केतकी कोणता नवा प्रोजेक्ट घेऊन येतायत की आणखी काही वेगळं शिजतंय, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.यापूर्वी भूषण प्रधान आणि अनुषा दांडेकरच्या अफेअरच्या चर्चा होत्या. दोघं अनेकदा कार्यक्रमांना एकत्र दिसले होते. त्याचबरोबर सोशल मिडीयावर फोटोसुद्धा शेअर करतात. त्यामुळे आता अनुषासोबत भूषणचा ब्रेकअप झाला का? असा प्रश्नसुद्धा चाहत्यांना पडला आहे.दरम्यान, भूषण प्रधानच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यानं घरत गणपती, जुनं फर्निचर, तू तिथे असावे यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

# पुण्यातून दोन महिलांना आणलं अन् रत्नागिरीत भलताच प्रकार उघड; नेपाळी महिलेला अटक

**रत्नागिरी:** काही महिन्यांपूर्वी रत्नागिरी येथे एक सेक्स स्कँडल उघड झालं होतं.त्यानंतर आता पुन्हा एकदा आता रत्नागिरी एमआयडीसी परिसरात सेक्स स्कँडलचा पर्दाफाश पोलिसांनी केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने रत्नागिरी एमआयडीसी परिसरात सुरू असलेल्या अनैतिक देह व्यापाराचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका नेपाळी महिलेला अटक केली आहे. ही महिला पुणे येथील दोन महिलांकडून देहविक्रीचा व्यवसाय चालवत होती. या दोन महिलांची सुटका करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला एमआयडीसी रत्नागिरी येथे अनैतिक व्यापार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी एक बनावट ग्राहक (डमी गिऱ्हाईक) पाठवून सापळा रचला. मिरजोळे एमआयडीसी येथील प्लॉट ई-६९ येथे छापा टाकण्यात आला असता, ही कारवाई उघडकीस आली. छाप्यामध्ये एक नेपाळी महिला पुणे येथील दोन महिलांकडून देहविक्री करवून घेत असल्याचे आढळले. याप्रकरणी पोलिसांनी नेपाळी महिलेवर अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हा गुन्हा रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे. देहविक्रीच्या व्यवसायातून ताब्यात आलेल्या दोन महिलांची सुटका करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नितीन बगाटे अप्पर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन ढेरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली.

दरम्यान, राज्यातील अनेक शहरांमध्ये देह व्यापाराच्या घटना उघडकीस येत असून यासंबंधीत रॅकेट उद्ध्वस्त करण्याचं मोठं आव्हान पोलिसांसमोर निर्माण झालं आहे.



# नवरात्रोत्सवात अन्न पदार्थातून विषबाधा टाळा !

## अन्न व औषध प्रशासनाच्या सूचना जारी....

**जनसंचलन/बुलढाणा**

नवरात्रीच्या काळात नागरिकांना अन्न पदार्थातून विषबाधा होवू नये या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवात भाविकांकडून उपवास ठेवले जातात. उपवासाचा पदार्थ म्हणून नागरिकांकडून मोठ्याप्रमाणात भगर अथवा भगरीच्या पदार्थाचे सेवन केल्या जाते. भंडाऱ्यामध्ये प्रसाद म्हणून भगरीची खिचडी वाटप केली जाते. मात्र, भगरीबाबत योग्य काळजी न घेतल्यास अन्न पदार्थातून विषबाधा होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालयामार्फत जारी करण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे. भगरी व भगर पासून बनवलेली उपवासाची खिचडी किंवा भाकरी इ. पासून अन्न विषबाधा होऊ नये यासाठी खबरदारी कशी घ्यावी, याबाबत दिलेल्या सूचनांनुसार भगरीसाठी वापरले जाणारे धान्य फक्त परवाना धारक व नोंदणीकृत विक्रेत्याकडून खरेदी करावे. धान्य स्वच्छ, बुरशीविरहित व कीडरहित असावे. धान्य दळताना/कुटताना स्वच्छ गिरणी किंवा यांत्रिक पद्धत वापरावी. आयत्या पिठाचा वापर करण्याऐवजी भगर दळून ताज्या पिठाचा वापर करावा आयते पीठ घ्यावयाचे असल्यास केवळ कंपनीने तयार केलेले पॅक पॅकेटचा वापर करावा. त्यावरील वापराची अंतीम तारीख बघून घ्यावी. भगरी शिजवण्यासाठी स्वच्छ व उकळलेले पाणी वापरावे. अर्धवट शिजलेली भगरी खाणे टाळावे, कारण त्यामुळे जंतुसंसर्गाचा धोका वाढतो. शिजवताना व शिजल्यानंतर भगरीवर माशा/धूळ बसू नये याची काळजी घ्यावी.

**साठवणूक व वितरण कसे करावे :**

भगरी गरम ठेवूनच वाटप करावी. थंड झाल्यास जंतूंची वाढ होण्याची शक्यता असते. ४ तासांपेक्षा जास्त वेळ भगरी साठवून ठेवू नये. शिळ्या भगरीमुळे प्रकृतीस अपाय होण्याचा धोका उद्भवतो. वितरणासाठी स्वच्छ व बंद डब्यांचा/भांड्यांचा वापर करावा. प्रसाद वाटपाच्या ठिकाणी पेयजल व हात धुण्याची व्यवस्था असावी.

**खाद्य हाताळणाऱ्यांनी घ्यावयाची काळजी :**

जे लोक भगरी बनवतात किंवा वाटतात त्यांनी हात स्वच्छ धुवावे, नखे कापलेली ठेवणे, टोप्या व हातमोजे वापरणे बंधनकारक करावे. सर्दी, ताप, जुलाब, त्वचारोग असलेल्या आजारी व्यक्तींनी अन्न हाताळू नये. अशा सूचना तथा आवाहन अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. जनजागृतीसाठी मंडळे, स्वयंपाक समिती व जनतेमध्ये योग्य सूचना फलक लावावेत. स्थानिक आरोग्य व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी तपासणी करून मार्गदर्शन करावे.

**विक्रेते, दुकानदार यांनी घ्यावयाची काळजी :**

भगर धान्य कोरड्या, हवेशीर व आर्द्रतामुक्त ठिकाणी साठवावे. पॅकिंग करताना स्वच्छ व फूड-ग्रेड पॅकिंग साहित्य वापरावे.



पॅकेटवर उत्पादन दिनांक, बेस्ट बिफोर दिनांक, क्रमांक स्पष्टपणे लिहावे. परवाना धारक वितरक किंवा उत्पादक यांच्याकडूनच माल खरेदी करावा. भगरी अथवा धान्य जमिनीला न लागता झाकून व उंचावर ठेवावे. दुकानात ओलावा, उंदीर, झुरळ, कीड यांचा प्रादुर्भाव होऊ नये. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य पद्धतीने विक्री करावी. जुनी भगर, ओलसर, कालबाह्य व बुरशी लागलेली भगर विक्रीस ठेवू नये. वजनकाटे, मापे व पॅकिंग स्वच्छ ठेवावे. प्रत्येक दुकानदाराने खरेदी आणि विक्रीचा सर्व तपशील (खरेदी बिले, साठा नोंदवही) सांभाळून ठेवावी. ग्राहकांना देताना ग्राहकांना स्वच्छ पिशवी किंवा डब्यातच वस्तू द्यावी. सैल भगरी देताना ओले हात लावू नयेत. आवश्यकतेनुसार ग्राहकांना साठवण व शिजवणुकीबाबत मार्गदर्शन करावे, अशा सूचना तथा आवाहन अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# नवरात्रोत्सव काळात शहरातील वाहतुकीत बदल

## २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान पर्यायी मार्ग

**जनसंचलन/बुलढाणा**




नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार असून मोठी देवी संस्थान, बुलढाणा येथे दहा दिवसांचा उत्सव पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर वाहतुकीच्या सुनियमन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहरातील वाहतुक ही पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आदेश जारी केले आहे. शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता तसेच जनतेच्या सुरक्षिततेसाठी व वाहतुकीच्या सुनियमनासाठी बुलढाणा शहरातील जड वाहतूक २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत त्रिशरण चौक, बुलढाणा ते तहसिल चौक, जयस्तंभ चौक बुलढाणा या रोडवरुन येणाऱ्या वाहतुकीसाठी त्रिशरण चौक -सर्क्युलर रोड -धाड नाका- जयस्तंभ चौक हा पर्यायी मार्ग आणि जयस्तंभ चौक, तहसिल चौक, बुलढाणा ते त्रिशरण चौक, बुलढाणा रोड वरुन जाणाऱ्या वाहतुकीसाठी जयस्तंभ चौक, धाड नाका सर्क्युलर रोड - त्रिशरण चौक हा पर्यायी उपलब्ध करण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास मुंबई पोलीस अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत मच्छीमारांसाठी अपघात गटविमा संरक्षण

**जनसंचलन/बुलढाणा**

मत्स्यव्यवसाय हा धोका पत्करून केला जाणारा उपजीविकेचा मुख्य आधार असून, मच्छीमारांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र शासन व राज्य शासनामार्फत प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत अपघात गटविमा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत मासेमारीदरम्यान अपघाती मृत्यू किंवा पूर्णतः, कायमचे अपंगत्व आल्यास प्रत्येकी रु.५ लाखांचे विमा संरक्षण दिले जाते. अंशतः अपंगत्व आल्यास रु.२.५० लाखांचे विमा संरक्षण मिळते. तसेच वैद्यकीय उपचारासाठी रु.२५ हजारापर्यंतचा खर्च या योजनेतून भागविला जातो. सदर योजना राष्ट्रीय मत्स्यिकी विकास मंडळ, हैद्राबाद यांचेमार्फत कार्यान्वित असून विम्याचा प्रीमियम केंद्र शासन व राज्य शासन यांच्या तर्फे अदा करण्यात येतो. मत्स्यव्यवसाय करणारे मत्स्यशेतकरी व व्यवसायाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निगडीत व्यक्ती, मत्स्यउद्योजक, मत्स्य विक्रेते, मच्छीमारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, आपल्या कुटुंबाचे व स्वतःचे भविष्य सुरक्षित करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय तांत्रिक बुलढाणा कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

# आयटीआय खामगावची समुपदेशन प्रवेश फेरी उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

सतगुरू श्री अगाशे काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगांव या संस्थेतील शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेअंतर्गत ऑगस्ट २०२५ च्या प्रवेश सत्रात संस्थेमध्ये नवीन वेळापत्रकानुसार प्रवेशाच्या समुपदेशन फेरी घेण्यात येणार आहे. या समुपदेशन फेरीद्वार प्रवेश घेण्याकरीता उमेदवारांनी २२ सप्टेंबर रोजी संस्थेत व्यक्तीशः हजर राहून आपली ऑनलाईन नोंदणी करावी. त्यानंतर रिक्त होणाऱ्या जागेवर ३० सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत दररोज प्रवेश फेरी होईल, अशी माहिती आयटीआयचे प्राचार्य एस.डि. गंगावणे आणि उपप्राचार्य व्हि. व्हि. काळे यांनी दिली. प्रवेशाकरीता या संस्थेत विविध व्यवसायाच्या सद्यस्थिती एकुण १४ जागा रिक्त आहे. जे उमेदवार ऑनलाईन नोंदणी/हजेरी नोंदवतील त्याच उमेदवारांची मेरीट यादी तयार होईल व मेरीट यादी नुसार रिक्त असणाऱ्या व्यवसायाच्या जागेवर नियमानुसार प्रवेश देण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. ऑनलाईन नोंदणी/हजेरी नोंदविणा-या उमेदवारांनी संस्थेत दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता संस्थेत व्यक्तीशा हजर राहावे, असे आवाहन आयटीआयचे प्राचार्य एस.डि.गंगावणे आणि उपप्राचार्य व्हि. व्हि. काळे यांनी केले आहे.


# देऊळघाट उमाळा रस्ता चार महिन्यांत उखडला

जनसंचलन/देऊळघाट



देऊळघाट उमाळा रस्ता चार महिन्यांत उखडला आहे. रस्ता तयार करण्यापूर्वी तीन ते चार स्तर टाकले जातात. टेंडरमधील अटी इस्टिमेटमध्ये बदलल्या जातात. इस्टिमेटमधील अटींची बहुतांश वेळा अंमलबजावणी केली जात नाही. टेंडरपेक्षा अधिक काम करण्यासाठी मक्तेदारावर दबाव टाकला जातो. कमी रकमेत अधिक काम केले जात असल्याने कामाचा दर्जा खालावतो. हा मार्ग प्रशासनाकडूनच सुचविला जातो. शिपायांपासून अधिकारी आणि नेत्यांचे समाधान करणारा मक्तेदार स्वतः ही समाधानी होतो. मात्र, रस्त्याच्या कामाला न्याय देऊ शकत नाही. रस्ता तयार झाल्यानंतर पाहणी करून दर्जा उत्तम असल्याचा शेरा नगरअभियंता आणि त्यांच्या संबंधित अभियंत्यांकडून दिला जातो. उत्तम दर्जाचा शेरा मारल्यानंतर अवघ्या दोन ते तीन महिन्यांतच रस्ते कसे उखडतात, हे न उलगडणारे कोडे आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी पुन्हा खर्च दाखविण्यात येतो आणि अर्थातच यातूनही मलिदा लाटला जातो. जनतेच्या पैशांतून होणारे हे रस्ते जनतेलाच त्रासदायक ठरत आहेत.

चार महिन्यांपुर्वी देऊळघाट ते उमाळा हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून करण्यात आला. पण या रस्त्याला चार महिने झाले अन् रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. सुरूवातीलाच रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे गावकऱ्यांनी संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले. परंतु याकडे दुर्लक्ष केले गेल्या. आज हा रस्ता संपुर्ण पुणे उखडला आहे. यामुळे रस्त्यावर खड्डेच खड्डे तयार झाले आहे. कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या तीन किलोमीटरच्या रस्त्यावरील खडीकरण, डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. तरी संबंधित विभागाने यांची गंभीर दखल घेऊन मजबूत रस्ता तयार करावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. जर महिन्या भरात उचीत कार्यवाही न केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.




# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी पंजाब आणि महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागांचा दौरा करून मोबाइल मेडिकल युनिट अभियानाचा केला शुभारंभ

जनसंचलन/बुलढाणा

पंजाब आणि महाराष्ट्रात नुकत्याच आलेल्या विध्वंसक पुराने जनजीवन विस्कळीत होऊन त्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या जीवनमानावर झाला आहे . या आपत्तीत सापडलेल्या नागरिकांना आधार देण्यासाठी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी या दोन्ही राज्यांतील पूरग्रस्त भागांचा दौरा केला. त्यांनी पंजाबमधील व्यास नदीच्या आसपासच्या गावांमध्ये आणि महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागाला भेट देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली . अपातग्रस्तांसोबत संवाद साधून त्यांनी त्यांच्या वेदना ऐकल्या घेतल्या आणि प्रशासनाला मदतीबाबत निर्देशित केले . सोबतच मोबाईल मेडिकल युनिट अभियानाचा शुभारंभ केलापंजाब आणि महाराष्ट्र, ही देशाची कृषिप्रधान आणि प्रगतिशील राज्ये, या आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली आहेत. केंद्र सरकार आणि संपूर्ण देश या राज्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे . अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली देशाच्या विविध भागांमधून मदत साहित्य आणि आर्थिक सहाय्य पूरग्रस्त क्षेत्रांपर्यंत पोहोचत आहे, जे राष्ट्रीय एकतेचे प्रतीक आहे.

या संकटाला तोंड देण्यासाठी पूरग्रस्तांच्या आरोग्य गरजांना सर्वोच्च प्राधान्य देत, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी ङ्गङ्घउत्तराखंड, हिमाचल, पंजाब आणि महाराष्ट्र पूरग्रस्तांसाठी मोबाइल मेडिकल युनिट () अभियानङ्घङ्घचा शुभारंभ केला. हा अभियान सरकार आणि सामाजिक संस्थांमधील भागीदारीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. यावेळी त्यांनी पर्नोड रिकार्ड इंडिया फाउंडेशनआणि फाउंडेशनयांचे मनापासून आभार मानले, ज्यांनी या पवित्र कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. या अभियानांतर्गत, सहा अत्याधुनिक आणि पूर्णपणे सुसज्ज मोबाइल मेडिकल युनिट्स सुरू करण्यात आली आहेत, जी पंजाब आणि महाराष्ट्रातील पूरग्रस्त गावांपर्यंत थेट पोहोचतील. ही युनिट्स ङ्गजागरूकता, निदान, उपचार, रेफरल ()फ्मॉडेलवर कार्य करतील, ज्यामुळे तात्काळ वैद्यकीय सहाय्य, रोग प्रतिबंध आणि गंभीर प्रकरणांमध्ये योग्य रेफरल सुनिश्चित होईल.असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला . हे अभियान केवळ तात्काळ मदतीपुरता मर्यादित नाही, तर त्याचा उद्देश दीर्घकालीन आरोग्य सुरक्षितता प्रदान करणे असा विश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# शेतकरी लुटवापसी सभेत रविकांत तुपकरांचा सरकारवर तुफान हल्ला...

जनसंचलन/बुलडाणा

अकोला शहरातील नामदेव पोहरे सभागृह, मराठा मंडळ, रामदास पेठ येथे किसान ब्रिगेडच्या वतीने शेतकरी लुटवापसी सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी कॉम्रेड अशोक ढवळे होते. देशभरातील दिग्गज शेतकरी नेते या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. यामध्ये राकेश टिकैत, प्रकाश पोहरे, विश्वास उटगी, अजीत नवले, पुरूषोत्तम खेडेकर, अजय भगत, कोटेश्वर राव, विजय कृष्णन, प्रशांत गावंडे, पि. साईनाथ आणि बच्चु कडु यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरूषोत्तम गावंडे यांनी केले. सभेत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमक भाषण करत सरकारवर जोरदार प्रहार केला. ते म्हणाले की आंतरराष्ट्रीय स्तरावर शेतकऱ्यांचा आवाज पोहोचवण्याचे काम पि. साईनाथ यांनी लेखणीच्या माध्यमातून केले, मात्र आपल्या देशातील तरुण पोरं नेत्यांचे वाढदिवस साजरे करण्यात रमलेली आहेत, पण स्वतःच्या बापासाठी, शेतकरी प्रश्नांसाठी लढायला पुढे येत नाहीत. त्यांनी सांगितले की १९७२ मध्ये सोन्याचे भाव आणि कापसाच्या एका क्विंटलचे भाव जवळजवळ सारखे होते, पण आज सोनं आकाशाला भिडलं असतानाही कापूस शेतकऱ्यांच्या डोक्यावरचं ओझं ठरलं आहे. शेतकरी आणि सोन्याच्या भावातील ही तफावत म्हणजे शेतकऱ्यांवरील प्रचंड अन्याय आहे. तुपकरांनी सोयाबीन प्रश्नावर भाष्य करताना सरकारला जबाबदार ठरवलं. त्यांनी सांगितले की सोयाबीन प्रक्रिया केल्यानंतर ८२ टक्के सोयापेंड आणि १८ टक्के तेल निघतं. सोयापेंड निर्यात चालू असताना सोयाबीनचे भाव ९ हजारांपर्यंत पोहोचले होते, पण निर्यात बंद केल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती विदारक असून मुलांची लग्नं होत नाहीत, घरात अडचणी वाढल्या आहेत. याउलट शेतकऱ्यांची पोरं नेत्यांच्या जयंत्या साजऱ्या करतात पण हक्कांसाठी लढायला तयार नाहीत, ही मोठी शोकांतिका आहे.



तुपकरांनी अतिवृष्टी नुकसानभरपाईतील दोन हेक्टरची मर्यादा हटवण्याची मागणी केली. त्यांनी स्पष्ट केले की जीएम सोयाबीनवर सरकारची भूमिका दुटप्पी आहे, कारण तेल आयात करायला मोकळीक आहे पण पेरणीस बंदी आहे. हा शेतकऱ्यांचा सरळ अपमान आहे. त्यांनी कठोर शब्दांत सरकारवर टीका करत म्हटले की इंग्रज गेले पण काळे इंग्रज शेतकऱ्यांची लूट करत आहेत. आपल्या भाषणात त्यांनी तरुणांना आवाहन केले की भगतसिंगाचा आदर्श घेऊन आक्रमक व्हावे, संघटित व्हावे आणि हक्कांसाठी निर्णायक लढा उभारावा. ग्लॅमरच्या कार्यक्रमांना लोक जमतात पण शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी कोणी येत नाही, ही मानसिकता बदलावी लागेल, अन्यथा नेपाळसारखी परिस्थिती निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी तुपकरांनी शेतकरी नेत्यांना एकत्र आणण्याचे काम केल्याबद्दल प्रकाश पोहरे यांचे विशेष आभार मानले. त्यांनी सांगितले की लुटवापसी सभा ही शेतकऱ्यांच्या लढ्याचे एक ऐतिहासिक पाऊल आहे. सभेत उपस्थित सर्व नेत्यांनी शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीवर चर्चा करून शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. अकोल्यातील ही सभा शेतकरी चळवळीच्या इतिहासात एक महत्वपूर्ण टप्पा ठरली असून, नेत्यांच्या एकतेतून सरकारविरुद्ध निर्णायक लढ्याची ठिणगी पेटली आहे असे तुपकर यावेळी म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८